**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ६० वा ● मंगळवार १६ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 60 | Date : 16/07/2024 blow Tuesday Page 4 Price 4

## राज्यात सरासरीच्या १५ टक्के जास्त पाऊस; जुलैमधील पावसाची स्थिती

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे : राज्यात जुलैच्या पहिला पंधरावड्यात मोसमी पावसाने सर्वदूर हजेरी लावली. राज्यात सरासरीच्या पंधरा टक्के अधिक पाऊस पडला असला तरीही विदर्भ, सातारा, नंदूरबार, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात अद्यापही दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १५ जुलैअखेर राज्यात सरासरीच्या तुलनेत १५ टक्के जास्त पाऊस झाला आहे. एक जून ते १५ जुलै, या काळात राज्यात सरासरी ३६०.८ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात ४१५.६ मिमी पाऊस झाला आहे. कोकण विभागात नुकत्याच झालेल्या पावसाने सरासरी भरून काढली आहे. सरासरीच्या तुलनेत मुंबई शहरात ८ टक्के, मुंबई उपनगरे २६ टक्के, पालघर १८ टक्के, रायगड २५ टक्के, रत्नागिरी ३१ टक्के, सिंधुदुर्ग ३८ आणि ठाणे जिल्ह्यात १५ टक्के जास्त पाऊस पडला आहे.



मध्य महाराष्ट्रात सरासरीच्या २२ टक्के अधिक पाऊस पडला आहे. सरासरी ३६४.३ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात ३२१ मिमी पाऊस पडला आहे. नगरमध्ये ४१ टक्के, धुळे २० टक्के, जळगाव ६० टक्के, कोल्हापूर ५ टक्के, नाशिक ८ टक्के, पुणे २२ टक्के, सांगली ४१ टक्के आणि सोलापुरात ८४ टक्के अधिक पाऊस पडला आहे. तर सरासरीपेक्षा कमी पाऊस साताऱ्यात आणि नंदूरबारमध्ये झाला आहे. साताऱ्यात ८ टक्के आणि नंदूरबारमध्ये १९ टक्के कमी पाऊस झाला.

मराठवाड्यात सरासरीपेक्षा १८ टक्के अधिक पाऊस झाला. हिंगोली आणि नांदेड वगळता अन्य जिल्ह्यांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. सरासरी २१२.२ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात २५१.४ मिमी पाऊस पडला आहे. । पान २ वर

## राज्य कबड्डी असोसिएशनच्या निवडणुकीला अखेर आव्हान
### उच्च न्यायालयात गुरुवारी तातडीची सुनावणी




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

कराड : राज्य कबड्डी असोसिएशनच्या निवडणुकीला उच्च न्यायालयात अखेर आव्हान देण्यात आले आहे. त्यावर गुरूवारी (दि. १८) तातडीची सुनावणी होणार असल्याने येत्या रविवारी (दि. २१) संघटनेची निवडणुक होणार की त्याला स्थगिती मिळणार याकडे तमाम कबड्डीप्रेमींचे लक्ष लागून राहणार आहे.सातारा जिल्हा हौशी कबड्डी असोसिएशनचे प्रा. अशोककुमार चव्हाण व राष्ट्रीय खेळाडू फिरोज पठाण या याचिकाकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्य कबड्डी संघटनेने कार्यकारी समितीची वयोमर्यादा, कार्यकाल मर्यादा, मतदानाच्या । पान २ वर

## छगन भुजबळ पवारांच्या भेटीला गेल्याने राज्यकीय चर्चांना उधाण

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



मुंबई : छगन भुजबळ यांनी शरद पवारांची भेट घेतली, त्यामुळे त्यांच्या भेटीची चांगलीच चर्चा झाली. कारण बारामतीत त्यांनी जे भाषण केलं त्या भाषणात त्यांनी शरद पवारांवर जोरदार टीका केली. शरद पवारांनी आरक्षणाच्या नावाखाली महाराष्ट्र पेटवण्याचं काम केलं असा आरोप छगन भुजबळ यांनी केला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सिल्व्हर ओक या शरद पवारांच्या निवासस्थानी जाऊन छगन भुजबळ त्यांना भेटले. या भेटीत कुठल्या मुद्द्यांवर चर्चा झाली त्याची एक सविस्तर पोस्टच छगन भुजबळ यांनी केली आहे.

जुलै २०२३ मध्ये अजित पवार यांनी सत्तेत सहभागी होत आपले काका आणि त्यांचे राजकीय गुरु शरद पवार यांना धक्का दिला. अजित पवारांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे ४२ आमदारही आले. त्यावेळी छगन भुजबळ यांच्याबाबत शरद पवारांनी मिश्कील प्रतिक्रिया दिली होती. छगन भुजबळ तिकडे गेले त्याबाबत शरद पवारांना विचारलं तेव्हा ते म्हणाले, तिकडे (अजित पवार गट) काय चाललं आहे बघून येतो. त्यानंतर त्यांनी थेट मंत्रिपदाची शपथ घेतली. हे वक्तव्य ऐकून एकच हशा पिकला होता. त्यानंतर शरद पवार यांच्यावर छगन भुजबळांनी टीकाही केली. लोकसभेच्या निवडणुकीआधीही भुजबळ यांनी काही मुलाखती दिल्या त्यातही त्यांनी शरद पवारांविरोधात भूमिका घेतल्याचं दिसून आलं. एवढंच काय । पान २ वर

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धनाच्या कामांची उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी केली पाहणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार कामे पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, त्यामध्ये श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम १५ मार्चपासून सुरू करण्यात आले आहे. सदरच्या कामांची पाहणी विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी केली. यावेळी मंदिर समितीचे सह.अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, अक्षय महाराज भोसले उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन व्हावे यासाठी आपण चार वर्षे पाठपुरावा केला होता. त्यानुसार आता पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली अतिशय सुंदर काम सुरू असल्याबाबत समाधान व्यक्त केले. विशेष म्हणजे श्री विठ्ठल व रुक्मिणी च्या मूर्तीला कोणतीही हानी न पोहोचता हे । पान २ वर

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापूर जिल्हा दौरा



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिनांक १६ व १७ जुलै २०२४ रोजी पंढरपूर जिल्हा सोलापूर दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे राहील.

मंगळवार १६ जुलै २०२४ रोजी सायं. ४ वा. कृषी पंढरी २०२४ प्रदर्शनाचे उद्धाटन स्थळ -कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, पंढरपूर. सायं ४.१५ वा. मोटारीने शासकीय विश्रामगृह पंढरपूर कडे प्रयाण. ४.३० वा. पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी या पर्यावरण विषयक जनजागृतीपर उपक्रमाचा समारोप सोहळा, शासकीय विश्रामगृह. सायं. ५ वा. विविध विशिष्ट मंडळे लोकप्रतिनिधी यांच्या भेटीसाठी राखीव स्थळ- शासकीय विश्रामगृह, पंढरपूर. सायं.६ वाजता शास्त्रीय विश्रामगृह येथे राखीव.

बुधवार, दिनांक १७ जुलै २०२४ रोजी मध्यरात्री २.२० वा. शासकीय विश्रामगृह येथून मोटारीने श्री विठ्ठल रखुमाई मंदिराकडे प्रयाण व आषाढी यात्रा २०२४ श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा. पहाटे ४.३० वा. देव वृक्ष सुवर्णपिंपळ बीज प्रसादाचे प्रतिनिधीक स्वरूपात वारकऱ्यांना वाटप अजान रुक्ष लोकार्पण व माहितीपत्रकाचे विमोचन कार्यक्रम. पहाटे ४.४५ वा. मोटारीने शासकीय विश्रामगृहकडे प्रयाण. पहाटे ५.०० वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव . सकाळी ९.०० वाजता सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी भेटीगाठीसाठी राखीव. । पान २ वर






## संपादकीय

### हेच आजचे राजकारण ..

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे नाव या देशाच्या राष्ट्रीय प्रमुख व्यक्तींमध्ये सूचिबध्द झाले असल्यामुळे त्यांचे नाव आणि छायाचित्र आता सर्व पक्षांचे आणि विचारांचे झाले आहे. त्यामुळे सर्वच पक्ष आणि आघाड्या बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र आणि नाव आपापल्या निवडणूक प्रचारात आणि आघाडीच्या संकल्पनाम्यात किंवा वचननाम्यात वापरू शकतात. आता हा आनंदाचा आणि अभिमानाचाही मुद्दा आहे आणि अडचणींचाही. ज्या विचारांना बाळासाहेबांनी अनुसरले आणि भविष्यातील पिढ्यांनी ते अनुसरावे आणि पुढे न्यावे म्हणून ज्या समर्थ खांद्यावर त्यांनी आपल्या पक्षाची आणि संघटनेची जबाबदारी टाकली त्या उध्दव ठाकरे यांनाच आपल्याच पित्याच्या न्याय हक्कासाठी सर्वोच्च न्यायालयात सतत न्याय मागावा लागत आहे. म्हणून आता बाळासाहेबांच्या शिवसेनेला आणि उध्दव ठाकरे यांना न्याय देण्याची जबाबदारी ही सर्वोच्च न्यायालयाची आणि मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांची आहे. या देशात संविधान सर्वोच्च आहे, हेच कायद्याच्या विद्यार्थ्यांना शिकवले जाते. पण राजकारणाचे धडे गिरवताना आम्हाला हे शिकायला मिळाले की, विधानसभा आणि विधान परिषद तसेच लोकसभा आणि राज्यसभा ही सर्वोच्च सभागृह आहेत आणि त्यांच्यासमोर सर्वोच्च न्यायालय देखील थिटे आहे. कारण लोकशाहीच्या मूळ व्याख्येनुसार लोकांनी लोकांसाठी निवडलेले लोकांचे प्रतिनिधी त्या सभेत बसतात आणि कायदे करतात. ते कायदे मंडळ आहे. या कायदे मंडळाने सर्वानुमते किंवा बहुमताने जे कायदे पारित केलेले असतात ते सर्वोच्च न्यायालयालाही मान्य करावे लागतात. मुख्यमंत्री किंवा प्रधानमंत्रीही जेव्हा राज्यकारभार करतात तेव्हा मंत्रिमंडळ जे ठरवते त्यावर मुख्य वा प्रधानपदी बसलेल्याने शिक्कामोर्तब करणे अपेक्षित असते. पण स्वातंत्र्यानंतर आपल्या देशातील सामान्यांची मानसिकता ही राजा बोले प्रजा डोले, अशी असल्यामुळे जो मुख्य वा प्रधानपदी असेल त्याच्याकडेच निर्णयाचे अधिकार जातात. यामुळे काही वेळेला न्याय आणि संविधानही पायदळी तुडवले जाते. जसे यावेळेस झाले. म्हणूनच आता सगळी भिस्त आहे ती केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींवरच. निवडणूक आयोग आणि सभापती यांनी दिलेले निवाडे सर्वोच्च न्यायालयात निकालासाठी प्रलंबित आहेत. जातीनिहाय प्राधान्य हेच आजचे राजकारण झाले आहे.

# स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा वतीने दिला जाणारा 'गुणीजन गौरव पुरस्कार धोंडपा नंदे' प्रदान

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील वागदरी गावचे पत्रकार लेखक संपादक सामाजिक कार्यकर्ते पर्यावरण प्रेमी धोंडपा नंदे यांना प्रदान करण्यात आला श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापनदिन व गुरुपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून,

परमपूज्य मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजी व पूज्य श्री बसवलिंग महास्वामीजी यांच्या शुभाशिर्वादाने सादरकर्ते कर्नाटकचे ख्यातनाम गायक राजेश कृष्णन व प्रसिध्द निवेदिका अनुपम भट आणि सहकारी बेंगळूर यांचा 'संगीत संजे' हा कन्नड कार्यक्रमाने चौथे पुष्प संपन्न झाले.या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन परमपूज्य मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजी व विरक्त मठाचे मठाधिपती परम पूज्य बसवलिंग महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात डॉ. श्री व सौ शरणबसप्पा दामा, श्रीमती मल्लम्मा पसारे, उद्योजक बसवराज माशाळे, दत्तकुमार साखरे, अक्कलकोट लायन्स क्लबचे अध्यक्ष शिवानंद नंदगीं, माजी नगरसेवक लक्ष्मीकांत धनशेट्टी, कन्नड साहित्य परिषदचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी, राजशेखर उमराणीकर, राजकुमार झिंगाडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

गेल्या २५ वर्षांपासून वृत्तपत्र लेखन पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्या व गावगाथा दिवाळी माध्यमातून ग्रामीण संस्कृती रूढी परंपरा बदल वैशिष्ट्यपूर्ण अंक गेल्या दोन वर्षांपासून प्रकाशित करत आहेत व अक्कलकोट घडामोडी फेसबुक ग्रुप च्या माध्यमातून धोंडपा नंदे तालुक्यातील विविध प्रश्नांवर आवाज उठवला आहे याचं दखल घेऊन धोडपा नंदे यांना गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते गौरविण्यात आले. याआधी अक्कलकोट सोलापूर व पुणे येथे कार्यरत असलेले धोंडपा नंदे अनेक पुरस्कार मिळाले आहेत अन्नछत्र मंडळाचा गुणीजन गौरव पुरस्कार प्राप्त झाल्या बद्दल सर्वच क्षेत्रातून कौतुक अभिनंदन होतं आहे.तसेच धोडपा नंदे यांनी मा.अमोलराजे भोसले व अन्नछत्र मंडळांचे आभार व्यक्त केले आहे



# स्वेरीचा स्तुत्य उपक्रम वारकऱ्यांसाठी आनंददायी व हिताचा : माजी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यांसह इतर अनेक राज्यातील लाखो भाविक व वारकरी आषाढी वारीच्या निमित्ताने श्री. विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरीत येत असतात. त्यांना श्री. विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन झाल्याचे समाधान तर मिळतेच पण त्याचबरोबर जाता जाता स्वेरीच्या ग्रामीण व कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतीविषयक मौलिक माहिती मिळते ही देखील अधिक समाधानाची बाब आहे. शेतकरी-वारकऱ्यांच्या मध्ये नवीन तंत्रज्ञान, विज्ञान आणि संशोधन रुजवण्याचे कार्य या प्रदर्शनाच्या माध्यमातून स्वेरी तथा डॉ.बी. पी. रोंगे सर आणि त्यांचे सहकारी सातत्याने करत आहेत हे खूप महत्त्वाचे आहे. हा त्यांचा स्तुत्य उपक्रम शेतकऱ्यांसाठी आनंददायी आणि हिताचा आहे.' असे प्रतिपादन राज्याचे माजी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी केले. भाभा अणुसंशोधन केंद्र मुंबई आणि स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर (ऑटोनॉमस) यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण मानव आणि संसाधन विकास सुविधा केंद्र (आर.एच.आर. डी. एफ.) आयोजित 'ग्रामीण व कृषी तंत्रज्ञान प्रदर्शना'चे आज माजी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक-सचिव व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे हे होते. ग्रामीण भागामध्ये तंत्रज्ञान आधारित विकास गंगा पोहचावी आणि ग्रामीण भागातील नागरिक व शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक विकास व्हावा हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. गाव आणि शहर यामध्ये पडत असलेली दरी कमी व्हावी या हेतूने हा उपक्रम गेल्या दहा वर्षांपूर्वीपासून भारताचे जेष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या संकल्पनेतून राबविला जात आहे. या प्रदर्शनामध्ये नवनवीन तंत्रज्ञानाद्वारे विकसित बियाणे, कृषी संबंधित विविध कार्यासाठी आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर, विविध कृषी साहित्य व कृषी अवजारे हे पाहण्यासाठी वारकरी, शेतकरी व ग्रामस्थ गर्दी करत असतात. शेतकऱ्यांसाठी असलेल्या सुविधा, बियाणे, औजारे, माती परीक्षण संच, पाणी परीक्षण, अनार दाणा, चिक्कु पावडर, विविध प्रकारचे पापड, शेंगदाणे बियाणे, कडधान्ये, ड्रोन तंत्रज्ञानाचा शेतीसाठी वापर यासंबंधी माहिती यातून मिळत आहे. तसेच माती परीक्षण किट, सोलार ड्रायर, तुळशी चहा, रोपे पेरणी यंत्र, जल शुद्धीकरण संयंत्र, यांत्रिक शेती, विज्ञान, माती परीक्षण, सोलर ड्रायरच्या माध्यमातून तयार केलेली उत्पादने, विविध प्रकारचे तंत्रज्ञान या प्रदर्शनात मांडलेले आहेत. सोबतच पशुधन विकास, फळभाजी संवर्धन, पाणी संवर्धन, जलशुद्धीकरण यंत्र, शेती, विज्ञान व तंत्रज्ञान या विषयी माहिती एलसीडी प्रोजेक्टरच्या माध्यमातून या प्रदर्शनात दिली जात आहे. या प्रदर्शनाला वारकरी, शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी विजापूर, गुलबर्गा, बागलकोट, यवतमाळ, नांदेड, परभणी, सांगली, सातारा, परभणी, यवतमाळ, सोलापूर अशा विविध जिल्ह्यातील वारकरी व शेतकऱ्यांनी भेटी देवून माहिती जाणून घेतली. यावेळी पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य राजेश पांडे, मोहन डांगरे, गोपाळपूरचे सरपंच अरुण बनसोडे, उपसरपंच बाळासाहेब आसबे, तारापूर परमाणु विद्युत केंद्र सामाजिक जबाबदारी (सीआरएस) अंतर्गत सुरु असलेल्या आकृती विभागाचे प्रमुख डॉ.आर.एस. पवार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.पी.एम.पवार, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए.पी.केने, समन्वयक डॉ. एम.एम.अवताडे, प्रा. अंतोष द्याडे, बालाजी सुरवसे यांच्यासह इतर प्राध्यापक व कर्मचारी, स्वेरीचे प्राध्यापक वर्ग यांच्यासह ग्रामस्थ व वारकरी उपस्थित होते. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

**मी मागील १५ वर्षापासून श्री विठ्ठलाच्या दर्शनाला येतो. स्वेरीच्या या प्रदर्शनाच्या माध्यमातून आम्हा शेतकऱ्यांना नवनवीन तंत्राची, पिके जोमाने येण्यासाठी बियाणे, पाणी, माती परीक्षण आदी शेती विषयक माहिती मिळाली. आता भविष्यात आम्ही आमच्या शेतीचा विकास करण्यासाठी या विज्ञान तंत्राचा वापर करून अधिक प्रगती करू शकतो. –वारकरी आत्माराम काकडे, बाबापूर (ता.वणी, जि.यवतमाळ)**



पान १ वरुन

### राज्यात सरासरीच्या १५..

बीडमध्ये ४० टक्के, छत्रपती संभाजीनगर ११ टक्के, धाराशिव ९२ टक्के, जालना २१ टक्के, लातूर ५२ टक्के आणि परभणीत २४ टक्के अधिक पाऊस पडला आहे. सरासरीच्या तुलनेत हिंगोलीत ६७ टक्के आणि नांदेडमध्ये १२ टक्के कमी पाऊस पडला आहे. विदर्भात सरासरी ३१९.१ मिमी पाऊस पडतो, यंदा ३०१.१ मिमी पाऊस झाला आहे. विदर्भात सरासरीच्या तुलनेत सहा टक्के कमी पाऊस पडला. ११ पैकी ६ जिल्ह्यांत कमी पावसाची नोंद झाली आहे. अमरावतीत १८ टक्के, भंडारा ३६ टक्के, चंद्रपूर १२ टक्के, गडचिरोली २१ टक्के, गोंदियात ३१ टक्के आणि नागपुरात सरासरीच्या २१ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. सरासरीपेक्षा जास्त पाऊस चार जिल्ह्यांत झाला आहे. अकोल्यात १२ टक्के, बुलडाण्यात ३१ टक्के, वर्धा ५ टक्के, वाशिम २४ टक्के आणि यवतमाळमध्ये २९ टक्के अधिक पाऊस झाला आहे. राज्यात धाराशिव जिल्ह्यात सरासरीपेक्षा ९२ टक्के अधिक पाऊस पडला आहे. सरासरी १८२.८ मिमी पाऊस पडतो, यंदा ३५१.७ मिमी पाऊस पडला आहे. हिंगोलीत सरासरीच्या तुलनेत ६७ टक्के कमी पाऊस झाला आहे. सरासरी २७७.७ मिमी पाऊस पडतो, यंदा ९१.७ मिमी पाऊस पडला आहे. धाराशिवला लागून असलेल्या सोलापुरातही सरासरीच्या ८४ टक्के जास्त पाऊस पडला आहे.

### राज्य कबड्डी असोसिएशनच्या

हक्काबाबत राष्ट्रीय क्रीडा संहितेतील नियम पायदळी तुडवून आपल्याला सोयीस्कर नियमांनुसार येत्या २१ जुलैला घेतलेली चौवार्षिक निवडणुक तात्काळ स्थगिती करावी म्हणून आम्ही उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

या निवडणुकीचा १८ जूनला कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणुकीत क्रीडा संहितेला पायदळी तुडवले जाणार असल्याचे संकेत होते. त्याविरोधात अनेक संघटनांनी राज्य संघटनेशी पत्रव्यवहार करून ते थांबवण्याचा प्रयत्न केला. पण, संघटनेने जुमानले नाही. काही संघटनांच्या पीटीआर उतान्यात गोंधळ असल्याचेही समोर आले. काहींचे पीटीआर नामंजूर होते तर काही संघटनांमध्ये वाद असल्यामुळे त्यांच्यात कायदेशीर लढाई असतानाही आपल्या जवळच्या संघटनांच्या जिल्हा प्रतिनिधींना मान्यता देण्याचे बेकायदेशीर काम राज्य संघटनेने केले. याबाबत राज्य संघटनेकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्यामुळे अखेर संयम सुटल्याने आम्ही उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. क्रीडा संहितेनुसार राज्य व सर्व जिल्हा संघटनांनी प्रथम घटनादुरुस्ती करावी, त्यानुसार निवडणूक प्रक्रिया राबवावी, असे आदेश क्रिडा संहितेच्या संदर्भाने या पूर्वीच न्यायालयाने दिलेत. क्रीडा संहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी हिंदुस्थानी हौशी कबड्डी महासंघाच्या (एकेएफआय) कार्यकारिणीला बरखास्त केले आहे. हे उदाहरण ताजे असतानाही राज्य संघटनेकडून क्रीडा संहितेला छेद दिल्याची बाब समोर आणत ॲड वैभव गायकवाड यांच्यातर्फे ही याचिका दाखल केल्याचे याचिकाकर्ते प्रा. अशोककुमार चव्हाण व फिरोज पठाण यांनी म्हटले आहे.

### छगन भुजबळ पवारांच्या भेटीला..

रविवारी बारामतीत त्यांनी शरद पवारांवर गंभीर आरोप केले. हेच छगन भुजबळ सोमवारी शरद पवारांच्या भेटीला गेले. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. अशात शरद पवारांसह नेमक्या कुठल्या मुद्द्यांवर चर्चा झाली त्याची पोस्ट छगन भुजबळ यांनी लिहिली आहे.

**शरद पवारांसह झालेल्या बैठकीत कुठल्या मुद्द्यांवर चर्चा?**

* राज्यातील सामाजिक परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी पुढाकार घेण्याची विनंती करण्यासाठी आज सकाळी शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली, तसेच त्यांच्याशी खालील मुद्द्यांवर चर्चा केली. * गेल्या काही दिवसांत राज्यात जातीवरून एकमेकांबद्दल मनं कलुषित मराठा व ओबीसी एकमेकांशी व्यवहारही करेनासे झाले आहेत * राज्याचे एक ज्येष्ठ नेते म्हणून महाराष्ट्रात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेणं ही त्यांची जबाबदारी * मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरावरून मराठवाडा पेटलेला असताना तो शांत करण्यासाठी सत्तेचा विचार न करता त्यांनी घेतलेल्या नामांतराच्या निर्णयाची आठवण करून दिली. * परंतु सध्याच्या या अशांततेच्या परिस्थितीत मात्र आपला कोणताही पुढाकार दिसत नाही, याबद्दल खंत व्यक्त केली. यावर त्यांनी मराठा किंवा ओबीसी उपोषणकर्त्यांना सरकारने काय आश्वासने दिली, याची काहीच कल्पना नसल्याचे सांगितले. * राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात गावागावात काय परिस्थिती आहे, याबद्दल त्यांचा अभ्यास अधिक आहे. त्यामुळे आपण पुढाकार घेतला पाहिजे, अशी विनंती त्यांना केली. * यावर येत्या दोन दिवसांत मुख्यमंत्री महोदयांशी बोलून मराठा व ओबीसी उपोषणकर्त्यांना सरकारने दिलेल्या आश्वासनांबाबत माहिती घेण्याचे, तसेच हा प्रश्न सोडविण्यासाठी कशा पद्धतीने आणि कोणाकोणाशी चर्चा करता येईल, हे ठरवणार असल्याचे आश्वासन शरद पवार यांनी दिलं आहे.

सध्या महाराष्ट्रात तंग झालेलं वातावरण शांत व्हावं, यासाठीच माझा हा प्रयत्न होता आणि यासाठी कोणालाही भेटण्याची वेळ आली तरी माझी त्यासाठी तयारी आहे. राज्यातील वातावरण शांत असलं पाहिजे, गोरगरिबांची घरे पेटता कामा नयेत, एकमेकांच्या जीवावर कोणी उठू नये हाच माझा यामागील हेतू आहे. केवळ सामाजिक प्रश्न म्हणून सर्व मतभेद, पक्ष बाजूला ठेवून यावर विचार करण्याची गरज आहे. या गोष्टीला राजकारणाचा कोणताही गंध लागता कामा नये, अशी प्रामाणिक अपेक्षा आहे. मला स्वतःला ना राजकारणाची पर्वा आहे, ना पदाची! राज्य शांत राहण्यासाठी मला आणखी कोणालाही भेटण्याची आवश्यकता वाटली तर मी आवर्जून भेटेन. याबाबत कोणालाही विनंती करायला मला कोणताही कमीपणा वाटणार नाही. त्यामुळे शरद पवार साहेब लवकरच राज्यातील वातावरण शांत करण्यासाठी पुढाकार घेतील, असा विश्वास आहे.

### श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धनाच्या

काम झाले आहे. सदर कामांमध्ये मंदिराचे झरोके, काही खिडक्या मोकळ्या केल्यामुळे मोठा फरक पडला आहे. सदर काम पाहता श्रद्धा व विज्ञान याचा सुरेख संगम झाल्याचे पहावयास मिळत आहे. तसेच शहरातील प्रदक्षिणामार्ग, भक्ती मार्ग, मंदिराचा दर्शन मंडप, संत विद्यापीठ आदींची काम देखील करण्याबाबत पाठपुरावा सुरू असल्याचे उपसभापती डॉ. गोरे यांनी सांगितले. आषाढी यात्रा कालावधीत भाविकांना आवश्यक व मुबलक सोयी-सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामध्ये दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री शेड, जादा पत्राशेडची निर्मिती, आपत्कालिन गेट, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर, चहा वाटप करण्यात येत असल्याची माहिती सह अध्यक्ष .गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी योवेळी दिली.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा

सकाळी ९.३० वा. मोटारीने चंद्रभागा बस स्थानकाकडे प्रयाण सकाळी १० वा. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चंद्रभागा बस स्थानक व यात्री निवास इमारत लोकार्पण सोहळा या कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ चंद्रभागा बस स्थानक. सकाळी १०.३० वा. तुळशी वृंदावन लोकार्पण सोहळ्याला उपस्थिती. सकाळी १०.४५ वा. राजश्री छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवन भूमिपूजन कार्यक्रम उपस्थिती. स्थळ -श्री संत गजानन महाराज संस्थान, स.११ वा. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान राज्यस्तर अंतर्गत शहरातील विविध ठिकाणी तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांचे भूमिपूजन. स्थळ- लिंक रोड कर्मयोगी शाळेकडे जाणारा मार्ग. स.११.१५ वा. स्वच्छ वारी निर्मल वारी कार्यक्रमाचे समारोप स्थळ पंचायत समिती पंढरपूर त्यानंतर सकाळी ११.३० वा. शासकीय वाहनाने बारामतीकडे प्रयाण



# समाज परिवर्तन युवा संस्था आयोजित वृक्षारोपण उपक्रम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

उल्हासनगर/ बाळासाहेब अहिरे : म्हारळगाव दि. १४ जुलैः वृक्ष हे मानवाचा जीवनदायी मित्र आहे हे विचार घेऊन आज कल्याण तालुका अंतर्गत येणाऱ्या म्हारळ गाव ग्रामपंचायत येथील इंदिरा नगर वॉर्ड क्र. १- डॉ.बाबासाहेब आंबेडकर खुले समाज मैदान येथे १०० वृक्ष, वृक्षारोपनाचा कार्यक्रम करण्यात आला. तसेच म्हारळ येथील बौद्ध विहारास ५० वृक्ष हे धम्मदान करण्यात आले. या उपक्रमास उल्हासनगर विधानसभेचे आमदार श्री. कुमार जी आइलानी साहेब यांची प्रमुख उपस्तीथी होती. तसेच या उपक्रमात म्हारळ गावचे प्रभारी सरपंच श्री. योगेश जी देशमुख , सदस्य ॲड. दिपक जी अहिरे, सौ. मोनिका गायकवाड. समाज कल्याण न्यास कल्याण तालुका अध्यक्ष - श्री.अजय जाधव. समाज परिवर्तन संस्थेचे अध्यक्ष. कु. जयेश जाधव, सह सचिव- भारती गायकवाड, खजिनदार- अनमोल भोईर, सल्लागार- दिनेश गोडांबे, सदस्य- प्रिमिला भोईर तसेच ग्रामस्थ आजच्या या उपक्रमात सहभागी झाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## खासदार प्रणितीताईंनी केले श्री. संत ज्ञानेश्वर महाराज,संत तुकाराम महाराज पालख्यांचे स्वागत




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः डोळ्याचं पारणं फेडणाऱ्या बाजीराव विहीर वाखरी येथील रिंगण सोहळ्यात खासदार प्रणितीताई शिंदे सहभागी होऊन नेत्रदीपक असा वारीचा रिंगण सोहळा अनुभवला.संतश्रेष्ठ ज्ञानेश्र्वर महाराज पालखी सोहळ्यात बाजीराव विहीर येथे उभे रिंगण अतिशय उत्साहात पार पाडले. पांडुरंगाच्या भेटीची आस लागलेले असंख्य वारकरी ओठांवर विठ्ठलाचे नाव, हातात टाळ-मृदुंग-पताका पायांना लागलेली पंढरीची ओढ हे सगळं पाहून मनाला अध्यात्मिक शांती लाभते. हा सुख सोहळा स्वर्गी नाही याची पावलोपावली प्रचिती देणारा आहे. आज बाजीराव विहीर वाखरी येथे डोळ्याचे पारणे फेडणारा नेत्रदिपक असा माऊलींचा रिंगण सोहळा... श्रद्धा व शिस्तीचे दर्शन घडवणारा अनुपम सोहळा .. याची डोळा याची नयनी अनुभवण्यासाठी खासदार प्रणितीताई शिंदे या लाखो वारकऱ्यांच्या सोबत आनंद सोहळ्यात सहभागी झाले होते. यानंतर खासदार प्रणितीताई शिंदे यांनी वारकरी, व गावकरी यासमवेत पायी चालत वारीचा विलक्षण सोहळा अनुभवला.यावेळी अमर सूर्यवंशी, संदीप पाटील, मनोज यलगुलवार, किरण घाडगे, नितीन शिंदे, पिंटू भोसले, राहुल पाटील, संदीप शिंदे यांच्यासह इतर मान्यवर सोबत उपस्थित होते.

## वारकरी पैलवानांमुळे लाल मातीची शोभा वाढली

### हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांचे विचार : श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेचे उद्घाटन




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः लाल मातीतील कुस्तीला जगविण्यासाठी डॉ. विश्र्वनाथ कराड अथक प्रयत्न करीत आहेत. ज्ञान सागराबरोबरच त्यांनी शक्तिची पुजा केली आहे. येथे आलेल्या वारकरी पैलवानांमुळे या लाल मातीची शोभा वाढली आहे, तसेच, त्यांनी या क्षेत्राला नवसंजीवनी दिली आहे.असे विचार हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांनी व्यक्त केले.

विश्र्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू-पंढरपूर परिसर विकास समिती, पुणे यांच्यातर्फे वाखरी, पंढरपूर येथे पालखी तळाच्या शेजारी, विश्र्वशांती गुरुकुल परिसरात वारकरी भाविक

भक्तांसाठी आषाढी वारीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या वेळी महाराष्ट्र राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री हभप बबनराव पाचपुते, माजी खासदार नानासाहेब नवले, प्रसिद्ध मराठी अभिनेता संदीप पाठक, कॅनडा निवासी रवी जोशी हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.तसेच, विश्र्वशांती केंद्र (आळंदी),माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा.कराड, ह भ प तुळशीराम दा कराड, प्रगतशील शेतकरी काशीराम दा. कराड, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हसिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्र्वनाथ कराड, डॉ. एस.एन. पठाण, डॉ. संजय उपाध्ये, श्रीकांत देशमुख, वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे आणि डॉ. टी. एन. मोरे उपस्थित होते.

हिंदकेसरी पै. दिनानाथ सिंग म्हणाले, हा सोहळा मन आणि चित्त प्रसन्न करतो. त्यामुळे येथे येणार्या प्रत्येक भक्ताला तीर्थक्षेत्रात आल्याची अनुभूती मिळते. डॉ. कराड यांनी वैष्णवांच्या मेळाव्यात कुस्तीचा आखाडा भरविला आहे. येथे भक्ती आणि शक्तीचा आदर्श उभा राहिलेला दिसत आहे.

विश्र्वधर्मी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा.कराड म्हणाले,मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास कठीण वज्रासी भेदू ऐसे, असा हा वारकरी संप्रदाय जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखवेल. आज येथे भक्ती आणि शक्तीचा संगम दिसून येत आहे.

नवी पिढी व्यसनाच्या आहारी जावू नये यासाठी कुस्ती भरविण्यात येते. त्यांनी मनगटात ताकद आणावी.प्रा.विलास कथुरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी.जी धनवे यांनी कुस्ती स्पर्धाचे नियोजन केले. सूत्रसंचालन डॉ. महेश थोरवे यांनी केले

## बीएससी थर्ड इयर विद्यार्थ्यांचे प्रश्न सम्यक विद्यार्थी आंदोलनाने लगेच सोडवले

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट येथील सी,बी खेडगी महाविद्यालयात बीएससी थर्ड इयर च्या विद्यार्थ्यांनी पेपरची फोटोकॉपी मिळावी यासाठी महाविद्यालय येथे अर्ज केला होता पण वीस दिवस झाल्यानंतर सुद्धा विद्यार्थ्यांना पेपरची फोटोकॉपी मिळाली नाही त्यामुळे बीएससी थर्ड इयर च्या अनेक विद्यार्थ्यांनी सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्य प्रवक्ता इंजिनीयर रविराज पोटे यांची भेट घेतली आणि हा प्रश्र्न सोडवण्याची विनंती केली त्यावेळी लगेच रविराज पोटे आणि विद्यार्थ्यांनी प्राचार्यांची भेट घेतली त्यांच्यासोबत चर्चा केली त्यानंतर लगेच विद्यापीठातील अधिकाऱ्यांसोबत फोनवर



रविराज पोटे यांनी संपर्क साधला आणि या विषयावर त्यांच्यासोबत चर्चा केली त्यावेळी अधिकाऱ्यांनी लगेच विद्यार्थ्यांचे प्रश्र्न सोडवले आणि सगळ्या विद्यार्थ्यांना पेपरची फोटोकॉपी मिळाली

## फेब्रुवारी महिन्यामध्येच मराठा भवन ची मागणी आ.आवताडे यांनी केली होती



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः तीर्थक्षेत्र पंढरपूर या ठिकाणी चार वारीच्या निमित्ताने लाखोच्या संख्येने वारकरी संप्रदाय हा येत असतो या वारकरी संप्रदायांमध्ये मराठा समाजातील लोक हे अग्रणीय संख्येने येत असतात व मराठा समाजासाठी सांस्कृतिक सामाजिक कार्यासाठी पंढरपूर शहरांमध्ये जागा नसल्यामुळे मराठा बांधवांची सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम पार पाडत नव्हती मला बांधवांना यासाठी पंढरपूर येथे गजानन महाराजांच्या पिछाडीस असलेली साईड क्रमांक ४५ या जागेवर मराठा भवन उभे केले जावे असे मागणी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी २ फेब्रुवारी १९२४ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये महाराष्ट्र शासनाकडे लेखी मागणी केलेली होती त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा बांधवांसाठी मराठा भवन उभे करण्यासाठी जागा व निधी उपलब्ध करून देऊ असे आश्र्वासन दिले होते या श्र्वासनाची पूर्ती आज मराठा बांधवांना मराठा भवन साठी जागा उपलब्ध झालेली आहे व त्या मराठा भाऊसाठी उभारण्यासाठी पाच कोटीचा निधी देखील शासनाने जाहीर केलेला आहे

मराठा बांधवांना अपेक्षित असलेली मराठा भवन ते पंढरपूर शहर मधील मध्यवर्ती ठिकाणी होत असल्यामुळे मराठा बांधवांचे आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे

## मल्टीस्टेट बँके च्या विरोधात धाराशिव- कळंब पोलिसात गुन्हा नोंद

### सर्व संचालक मंडळ फरार; ठेवीधारांची १ कोटी ९० लाखांची फसवणूक

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

कळंब/सुधाकर रणदिवे : ठेवीदारांची १ कोटी ९० लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी एका मल्टीस्टेट बँके विरोधात धाराशिव जिल्ह्यातील कळंब पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला असून संचालक मंडळ फरार झाले असुन. बीड येथील साईराम अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी यांनी ज्यादा व्याजाचे आमिष दाखवून ठेवीदार यांची फसवणूक केली. आरोपी नितीन जरीचंद भिसे, रा. सुर्डी ता. केज जि. बीड, श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड शाखा कळंब, शाखा अधिकारी साधना शाहीनाथ परभणे, अध्यक्ष श्रीराम सूर्यभान बोबडे, उपाध्यक्ष शाहीनाथ विक्रमराव परभणे, संचालक, सुभाष आप्पासाहेब उगले, संचालक लक्ष्मण विक्रमराव परभणे, संचालक सौ, अर्चना रवींद्र सुपेकर, संचालक, अर्जुन पंडित कांबळे, संचालक संजय पाटील बुवा सावंत, संचालक भगवान भानुदास काळे, संचालक, विठ्ठल ज्ञानदेव जाधव, संचालक साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड, शाखा कळंब येथील सर्व कर्मचारी यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे. २०१७ पासुन ते ३० जुन २०२४ या काळात आरोपीने संगणमत करून कट रचून फिर्यादी बाळासाहेब भुजंगराव कुपकर व ६२ वर्षे रा. सुर्डी ता. केज जि. बीड, व इतर ठेवीदारांना आकर्षक व्याज दराने आमिष दाखवून आकर्षित करून श्री साई राम अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी जिल्हा बीड, शाखा कळंब, शाखा येथे ठेवी ठेवण्यास सांगितले. सदर ठेवीची मुदत पूर्ण झाल्यानंतर ठेवीदार हे वारंवार ठेवीची रक्कम परत मिळणे बाबत शाखेत गेले असतात त्यांना उडवा उडविची उत्तरे दिली.आरोपींनी सदरची शाखा बंद करून निघून गेले यावरून फिर्यादी व ठेवीदार यांची १,९०,५३,६९० रू ( एक कोटी ९० लाख ५३हजार ६९० रुपयाची) फसवणूक झाली आहे. अशी फिर्यादी बाळासाहेब कुपकर यांनी दिल्यावरून कळंब पोलीस ठाणे येथे भ.दं.वी.सं कलम ४२०, ४०९, ४०६, १२०, ब सह कलम ३,४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## नवनाथ वाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी लुटला आनंद पंढरीच्या वारीचा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुरंदर/प्रतिनिधी :पुरंदर : नवनाथ वाडी( बोपगांव ) ता. पुरंदर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थी तसेच वाडीवरील भजनी मंडळ यांनी पंढरीची वारी तसेच शिक्षणाच्या वारीचे आयोजन केले होते नवनाथ वाडी शाळा ते कानिफनाथ गड,असे पायी वारीचे नियोजन केले होते,माऊली -माऊली चा गजर करत,ज्ञानोबा - तुकारामाच्या जयघोषात,व भजनी मंडळाच्या अभंगाच्या साथीत./ अमृताची गोडी तुझ्या भजनात/



मनाचा विसावा सुखी जीवनात / माझा पांडुरंग ऐसा तो अभंग भजनातदंग नाचू कीर्तनात /अमृताची गोडी तुझ्या भजनात/ भजन व फुगडी चा आनंद विद्यार्थ्यांनी अनुभवला.जयप्रकाश सेंड कर सर व संभाजी सेंड कर सर यांनी वारी बद्दल माहिती व संतांचे विचार सांगितले. अंगणवाडीच्या सुनिता गोपने व रेखा गोपने याही यामध्ये सहभागी झाल्या होत्या.तसेच कानिफनाथ मळ्यातील भजनी मंडळ यांनी शालेय विद्यार्थ्यांना उस्फुर्त अशी साथ दिली त्यामध्ये ज्ञानेश्र्वर (माऊली )कदम,रंगनाथ फडतरे,सागर फडतरे, महेश पवार, मनोज कदम, पंढरीनाथ पवार, पारूबाई फडतरे, निर्मला पवार,योगिता पवार,देवराम कोंडीबा फडतरे,सुशीला फडतरे, अनिकेत फडतरे,नवनाथ गायकवाड हे सर्व पालक वर्ग व भजनी मंडळ या नात्याने सर्वांनी पंढरीच्या वारीचा आनंद लुटला शेवटी कानिफनाथ गडावरील महाप्रसादाचा लाभ घेतला.या वारी सोहळ्याचं नियोजन जयप्रकाश सेंड कर सर व श्री संभाजी शेंडकर सर यांनी केले.

## भामट्यांनी चक्क पोलीस आयुक्त यांचा फोटो व नाव वापरून पैसे लुटण्याचा धंदा केला सुरू

### पोलीस आयुक्तांनी आशा घटनाना बळी न पडण्याचे केले आवाहन...!

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधीः आजच्या सोशल मिडीया आणि इंटरनेटच्या दुनियेत रोज नवनव्या फसवणूकीच्या घटना समोर येताना दिसतात. अनेकदा सोशल मिडीया हॅक करून अनेकदा आपल्या जवळच्या मित्र-मैत्रिणींना मदत म्हणून पैशांची मागणी केली जाते अशा घटना सामान्य नागरिकांसोबत रोजच घडतात मात्र, अशीच घटना पुणे पोलिस आयुक्तांच्या बाबतीत देखील घडली आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचा फोटो आणि नावाचा गैरवापर करत पैशाची मागणी केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचा फोटो डी.पी.वर ठेवून लोकांकडून पैशाची मागणी होत असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी यासंदर्भातील आपल्या व्हॉट्सपला स्टेटस ठेवून नागरिकांना माहिती दिली आहे. त्यांनी आपल्या व्हॉट्सपला स्टेटसमध्ये माझ्या फोटोचा गैरवापर करून नागरिकाकडून पैशाची मागणी होत आहे तरी अशा पद्धतीची कुठली रिक्वेस्टला किंवा मेसेजला रिप्लाय करू नये अशी विनंती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केली आहे.

## कुटुंब नियोजनाच्या अद्ययावत साधना बद्दल प्रबोधन आवश्यक : डॉ.रत्नमाला देसाई

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः पुरुष नसबंदी सुलभ आणि कमी खर्चाची, कमी वेळेत होणारी असताना सुद्धा केवळ पितृसत्ताक पद्धतीच्या वर्चस्वामुळे पुरुष शस्त्रक्रिया करून घेण्यास उदासीन असतात. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिये बद्दल प्रबोधन आणि जागृती होणे आवश्यक आहे. सध्या वैद्यकीय सेवा देणाऱ्या केंद्रात नवनवीन कुटुंब नियोजनाची साधने उपलब्ध आहेत. गर्भनिरोधक गोळ्या, प्रेवेन - कमांड एस्ट्रोजन प्रोजेस्टीन पिल्स, निरोध, डायफ्राग्राम, सर्वाइकल कॅप्स, वजनल रिंग, तांबी, इस्ससुर, स्प्रे-ऑन कॉन्ट्रासेप्टिवस, वॅक्सिन्स, हार्मोन रिलीजिंग आययुसीडीज, डेपो प्रोवेरा




इंजेक्शन, आय. पीएल्स, इम्प्लांट, स्लीक्स, पॅच आदींच्या वापरामुळे जन्मदर घटून भारताच्या वाढत चाललेल्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवता येऊ शकेल असा आशावाद फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, प्रसिद्ध स्त्रीरोग प्रसूती व शास्त्रज्ञ डॉक्टर रत्नमाला देसाई यांनी व्यक्त केला.

त्या अश्र्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, कुंभारी व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने वैद्यकीय महाविद्यालयाच्या व नर्सिंगच्या विद्यार्थ्यांकरीता अश्र्विनी वैद्यकीय महाविद्यालयाच्या समर्पण या ऑडिटोरियम मध्ये आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून रिसेंट ऍडव्हान्सेस इन कॉन्ट्रसेप्शन या विषयावर बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अश्र्विनी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी हे होते. यावेळी व्यासपीठावर धारवाड येथील सुप्रसिद्ध सर्जन डॉ. मल्लिकार्जुन देसाई, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, फायनान्स डव्हायझर सपना चिट्टे, सदस्य प्रा. डॉ. विजया महाजन, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, अश्र्विनी सहकारी रुग्णालयाचे संचालक अशोक लांबतुरे, डॉ. एस. एम. करजखेडे, डॉ. संजय खांडेकर, डॉ. सुकुमार मकदुम, डॉ. जयंती आडके, डॉ. अरुंधती कुलकर्णी, युवा प्रतिनिधी ऐश्र्वर्या सावंत, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सुहास कुलकर्णी म्हणाले की, वैद्यकीय महाविद्यालयाच्या भावी डॉक्टरांनी व नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी अद्ययावत वैद्यकीय ज्ञान संपादन केले पाहिजे व जिज्ञासा वृत्ति कायम ठेवली पाहिजे.सुरुवातीला डॉ. राजीव प्रधान यांनी डॉ. रत्नमाला देसाई तर प्रा.डॉ.विजाया महाजन यांनी डॉ. सुहास कुलकर्णी यांचा परिचय करून दिला. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार सपना चिट्टे यांनी मानले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे संकल्पित कार्य स्वराज्याच्या हितार्थ शंभूराजेंनी केले : प्रा. नितीन बानगुडे-पाटील



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः छत्रपती संभाजीराजे यांनी वयाच्या १६ व्या वर्षी स्वराज्याची पहिली मुद्रा उमटवली, १८ व्या वर्षी युवराज झाले. त्या काळात त्यांनी विविध क्षेत्रात केलेले कार्य हे उल्लेखनीय होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे संकल्पित कार्य स्वराज्याच्या हितार्थ शंभूराजेंनी केले असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांनी केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३७ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवनिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, सोमवार दि. १५ जुलै रोजी सायंकाळी ७ वा. ख्यातनाम व्याख्याते प्रा.नितीन बानुगडे-पाटील यांचे 'छत्रपती संभाजी महाराज' या विषयावर व्याख्यानाने ५ वे पुष्प संपन्न झाले.

पुढे बोलताना प्रा.बानुगडे-पाटील यांनी म्हणाले की, शिवरायांडून कसे जगावे हे शिकावे तर संभाजी राजांकडून कसे मरावे हे शिकावे. प्रतिकूल परिस्थिती अनकूल कशी करावी हे छत्रपती संभाजी राजांचे चरित्र अभ्यासले की लक्षात येतो. आपला इतिहास उज्वल आहे. तसाच आपला वर्तमान व भविष्यकाळही उज्वल करता आला पाहिजे, असे यावेळी म्हणाले. शंभूराजेंचा धगधगता इतिहास सांगून उपस्थित श्रोते गणांना प्रा.बानुगडे-पाटील यांनी मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन सो.म.पा माजी उपमहापौर दिलीपभाऊ कोल्हे, दहीटणेचे शिवाजीराव पाटील (सर), भाजपा नेते रमेश सिद्रामप्पा पाटील, जेष्ठ नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी, जेष्ठ पत्रकार बाबासाहेब निंबाळकर, डॉ.आर.व्ही.पाटील, राजीव माने, बाळासाहेब मोरे, ॲड.संतोष खोबरे, अविराज सिद्धे, विजय पोखरकर, जवहार जाजू, शेखर फंड, श्रीशैल होळ्ळे यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रसिद्ध व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. याप्रसंगी न्यासाचे विश्र्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, हिरकणी संस्थेच्या जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त भाऊ कापसे, लाला राठोड, राजेंद्र लिंबीतोटे, डॉ.मनोहर मोरे, संतोष भोसले, सुधाकर गोंडाळ, बाबुराव कुलकर्णी, सुनील गोरे, संजय फुटाणे, शिवराज स्वामी, मनोज निकम, सौरभ मोरे, ओंकारेश्र्वर उटगे, प्रा.शरणप्पा आचलेर, अरविंद शिंदे, शीतल फुटाणे, राजु नवले, प्रविण देशमुख, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, अमित थोरात,स्वामीराव सुरवसे, दिग्विजय कळसकर, प्रदीप तोरस्कर, दिंगबर डांगे, मनोहर चव्हाण, बाळासाहेब घाटगे, पिंटू साठे, बालाजी पाटील, गोविंद शिंदे, वैभव मोरे, प्रथमेश पवार, अतिश पवार, ज्ञानेश्र्वर भोसले, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्र्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले.

**अन्नछत्र हे संवेदनशीलतेचे प्रतिबिंब :** अन्नदान हे श्रेष्ठ दान असून, तीर्थक्षेत्र अक्कलकोटात स्वामी भक्तासाठी जन्मेंजयराजे भोसले यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ स्थापन करून, एक मातृत्व संस्था म्हणून त्यांनी या संस्थेच्या माध्यमातून धार्मिक कार्याबरोबरच समाज उपयोगी कार्य त्यांच्या हातून घडत आहे. अन्नछत्र हे संवेदनशीलतेचे प्रतिबिंब आहे.

**गुणीजन गौरव :** दुय्यम उपनिंबक डी.डी.चाटे, के.एल.ई.मंगरुळे प्रशालेचे मुख्याध्यापक नंदाजी कदम, स्थापत्य अभियंता राजसो शेळके, शिक्षक मनोज जगताप यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**गुणवंत विद्यार्थी गौरव :** तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.

**दि. १६ जुलै रोजी मंगळावर सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'किर्तन' राष्ट्रीय किर्तनकार व समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर (संगमनेर, अकोलेकर) यांचा कार्यक्रम होणार आहे.**

## शहरमध्यच्या उमेदवारीसाठी मुस्लिम समाजाने नाना पटोले यांची घेतली भेट




**दैनिक यशसिध्दि न्यूज**


सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर शहर मध्य मतदार संघातून काँग्रेस पक्षाकडून मुस्लिम समाजाला उमेदवारी देण्याची काँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे मागणी

देशाच्या स्वातंत्र्यापासून आजतागायत काँग्रेस पक्षाच्या वतीने सदर मतदार संघात उमेदवारी देण्यात आलेली नाही, प्रणिती शिंदे हे खासदार झाल्याने सदर मतदारसंघ रिक्त झालेले आहे. सुरूवातीपासून सदर मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला राहिलेला असून मुस्लिम समाज काँग्रेसच्या पाठीशी कायम राहिलेले आहे.

तरी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ कोणत्याही परिस्थितीत आपल्या काँग्रेस पक्षाकडे ठेवण्यात यावे आणि सदर मतदारसंघामध्ये मुस्लिम समाजाच्या नेत्याला उमेदवारी दिल्यास हमखास निवडून येण्याची शाश्र्वती आहे म्हणून सदर मतदार संघात मुस्लिम समाजाला विधानसभेची उमेदवारी देण्यात यावी. असे निवेदन सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष जुबेर कुरेशी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांना निवेदन दिले. सोलापूर शहर मध्य मधून जुबेर कुरेशी, माजी महापौर आरीफ शेख, शकील मौलवी, रूस्तुम कंपली, हाजी तौफिक हत्तुरे, कु. फिरदोस पटेल, शौकत पठाण आदी जेष्ठ काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी हॉटेल बालाजी सरोवर, सोलापूर येथे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेवून उमेदवारी मिळण्यास मागणी केली. यावेळी अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष वसीम पठाण, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, म.इलियास शेख, अब्दुल रजाक कादरी, मुर्तुज काझी, कय्युल बलोलखान, परवेज जमादार आदी उपस्थित होते.

## दुधनी व मैंदर्गी शिवारातील बोरी नदि पात्रातील वाळू चोरी थांबवावे: सैदप्पा झळकी











**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी व मेंदर्गी या परिसरातील बोरी नदी पात्रातील वाळू चोरी मोठ्या प्रमाणात होत आहे.ते तात्काळ थांबवावे अन्यथा रिपाइं(आठवले गट)कडून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे.अक्कलकोट तालुक्यातील दुधनी आणी मेंदर्गी शिवारातील बबलाद,चिंचोळी(मैं),आंदेवाडी(ज),रुद्रेवाडी,संगोगी(ब),बिंजगेर व सातनदुधनी येथील बोरी नदीतून मध्यरात्री भरमसाठ वाळू उपसा करुन अवैध्यरित्य विक्री केली जात आहे.या भागातील गोर गरीब व शासनाकडून विविध योजनेतून मंजूर झालेल्या घरकुलाचे बांधकाम महागड्या वाळू घेवून करणे मुस्कील झाले आहे.येथील वाळू दर एकब्रासला सहा हजार तर भीमा नदीतील वाळू पाच ब्रासला छप्पन हजार प्रमाणे विकली जात आहे.या भागातील पोलिस,पोलिस पाटील, पोलिसमित्र आणी सरपंच यांच्या संगनमताने हे वाळू उपसा करुन विकली जात आहे. अशा महागड्या वाळूमुळे अल्पअनुदान मिळणारे घरकुलधारक व गोर गरीब महाग असलेल्या वाळू ऐवजी डस्ट ने बांधकाम करणे पसंद करु लागले आहे. त्या मुळे संबंधित अधिकार्यांने जातीने लक्ष घालून हे सर्व वाळू दोरीने विकण्याचे प्रकार बंद करण्याचे मागणी श्री सैदप्पा झळकी यांनी केली आहे.

## सर्व यंत्रणांनी पुढील तीन दिवस अत्यंत दक्ष राहून काम करावे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी वारीच्या पार्श्र्वभूमीवर प्रशासनाने वारकरी व भाविकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. मा. मुख्यमंत्री महोदयांनी या सुविधांची पाहणी केली व समाधान व्यक्त केले. तसेच काही ठिकाणी रस्त्यावरील खड्डे बुजवणे, शौचालयाची संख्या वाढवणे, रस्त्यावरील होर्डिंग काढून रस्ते मोकळे करणे व अनुषंगिक सूचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे सर्व संबंधित विभागानी या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करावी व पुढील तीन दिवस अत्यंत लक्ष राहून आषाढी वारी यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

भक्तनिवास येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये आषाढी वारीच्या पार्श्र्वभूमीवर आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय अधिकारी अमित माळी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश नवले, मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, आषाढी वारीनिमित्त दिनांक १७ जुलै २०२४ रोजी माननीय मुख्यमंत्री च्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा होते. यावेळी पंढरपूर शहरात किमान दहा ते पंधरा लाख भाविक येण्याची शक्यता गृहीत धरून प्रशासनाने मागील दोन महिन्यापासून भाविकांसाठी विविध प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेप्रमाणे यामध्ये काही ठिकाणी बदल तर काही सुविधांमध्ये वाढ करण्याबाबत सांगण्यात आलेले असून त्याप्रमाणे सर्व संबंधित विभागाने अत्यंत तत्परतेने कामे पूर्ण करून घ्यावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

पंढरपूर शहरातील रस्त्यावरील वीज वितरण कंपनीचे पोल तसेच चौका चौकामधील होर्डिंग नगर परिषदेने त्वरित काढून घेऊन रस्ते मोकळे करावेत. तसेच नगर परिषदेने रस्त्यावरील खड्डे त्वरित भरून घ्यावेत. चंद्रभागा वाळवंटातील चेंजिंग रूम ची संख्या वाढवून घ्यावी. ज्या ठिकाणी चिखल झालेला आहे अशा ठिकाणी त्वरित खडी व मुरूम भरून घेऊन पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. शहरात स्वच्छता राखण्यासाठी आधीकचे मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या.

आरोग्य विभागाने अतिदक्षता विभागात फॅन व कुलरची संख्या वाढवावी. तसेच वाखरी पालखीतळ व ६५ एकरवर आरोग्य सुविधा निर्माण केलेल्या आहेत त्या ठिकाणीही फॅन व कुलरची व्यवस्था करून घ्यावी. रुग्णांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी आरोग्य पथके तयार ठेवावीत. दुचाकी वरील आरोग्य दूत सेवा अत्यंत चोख राहील यासाठी दक्ष रहावे. वीज वितरण कंपनीने पुढील तीन दिवस पंढरपूर शहरात वीज पुरवठा सुरळीत राहील यासाठी दक्ष रहावे. पंढरपूर प्रांत अधिकारी यांनी मटन व चिकन शॉप बंद राहतील याबाबत आदेश काढावेत. चंद्रभागा नदीमध्ये बोटी चालवणाऱ्या नाविकांना लाईव्ह जॅकेटचे वितरण करावे तसेच विना जॅकेट नदीमध्ये बोट चालवल्यास संबंधिताची बोट सीज करण्याची कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.

सर्व शासकीय विभाग प्रमुख त्यांच्यावर वारीच्या पार्श्र्वभूमीवर सोपवण्यात आलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडत आहेत. परंतु शेवटचे तीन दिवस महत्त्वाचे असून प्रत्येकाने अत्यंत दक्षपणे दिलेली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले.

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांच्या हस्ते शुभारंभ




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ संत मुक्ताबाई मठ येथे विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांच्याहस्ते करण्यात आला. राज्यातील महिलांनी याचा लाभ घ्यावा यासाठी रविवार दिनांक २१ जुलै रोजी गुरुपौर्णिमेपासून याचे राज्यभरात अभियान राबविले जाणार असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली या कार्यक्रमास अक्षय महाराज भोसले, स्वामी महामंडलेश्र्वर जनार्दन हरि महाराज, मुक्ताई पालखी सोहळयाचे अध्यक्ष रविंद्र भैय्यासाहेब पाटील, पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. रविंद्र महाराज हरणे, विश्र्वस्त पंजाब दादा पाटील,सम्राट पाटील, ज्योती वाघमारे यांच्यसह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना हे राज्य शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असून या योजनेचा लाभ २१ ते ६५ वयोगटातील प्रत्येक महिलेला मिळाला पाहिजे यासाठी सर्व शासकीय यंत्रणेने प्रयत्न करावेत. शासन ही या योजनेची मोठ्या प्रमाणावर प्रचार प्रसिद्धी करत असून ग्राम स्तरावरील प्रत्येक पात्र महिलेपर्यंत ही योजना पोहोचावी, असे डॉक्टर गोऱ्हे यांनी सांगितले. यावेळी एसटीच्या जादा गाड्या, वारकऱ्यांच्या वाहनांसाठी पथकर माफी तसेच महिलांना ५० टक्के व ७५ टक्के वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास एस.टी अशा सुविधा उपलब्ध असून, या सुविधांसह वारकऱ्यांचा विमा देखील काढला असल्याचे डॉ.गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.